REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 5 | FEBRUARY - 2019

# महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्या : कारणे व उपाय

प्रा. डॉ. सुदाम कडूजी कोरडे
सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग,
कला, वाणिज्य व विज्ञान महाविदयालय, नवापूर ता. नवापूर जि. नंदुरबार

## प्रस्तावना



जगातील अनेक व्यवसायांपैकी अत्यंत पुरातन व्यवसाय म्हणून शेती व्यवसाय ओळखला जातो. जगातील २/३ लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे तर भारतात ६५ टक्के लोक शेती व शेतीशी संबंधित आधारित व्यवसायात गुंतलेले आहेत. आज बरेच उदयोग हे शेतीतील कच्या मालावर निर्भर आहेत. शेतीवरच देशाची प्रगती अवलंबून आहे असे म्हटले तरी ती अतिशयोक्ती ठरणार नाही. अनेक उदयोगाची जननी कृषी ही आहे तर मग शेतीत राबणारा शेतकरी आत्महत्येचा मार्ग का स्वीकारतो.?

भारतामध्ये आर्थिक नियोजनाचे यश हे शेती क्षेत्राच्या विकासावर अवलंबून असल्याचे आतापर्यंतच्या योजनांचा अभ्यास केल्यानंतर लक्षात येते. भारतीय पंचवार्षिक योजनांना अपेक्षित यश प्राप्त न होण्याचे खरे कारण नियोजनाव्दारे शेती क्षेत्राकडे झालेले दुर्लक्ष होय. त्यामुळेच शेती क्षेत्रास आलेले अपयश होय. असे म्हणावे लागेल.

## शेतकऱ्यांच्या आत्महत्या :—

“जेव्हा एखादी कमकुवत मनाची व्यक्ती आर्थिक, सामाजिक आणि राजकीय कारणातून निर्माण झालेल्या नैराश्यातून अकाली आपली जीवन यात्रा संपवतो तेव्हा त्याला आत्महत्या असे मानले जाते”. आत्महत्या गळफास, विष प्राशन, विहिर किंवा उंचावरुन उडी घेणे, रेल्वेखाली येणे इत्यादी मार्गांनी केली जाते.

१९९५ पासून नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो हे शेतकरी आत्महत्यांची नोंद ठेवतो याचा अर्थ असा नाही की, त्याआधी आत्महत्या होत नव्हत्या, मात्र १९९० नंतर शेतकरी आत्महत्येची वाढती संख्या आणि प्रमाण यामुळे नोंदी ठेवण्यास सुरुवात झाली. महाराष्ट्रात विदर्भ हे शेतकरी आत्महत्येचे केंद्र. मात्र मागील पाच वर्षामध्ये मराठवाडयातील शेतकऱ्यांनी देखील आत्महत्या करण्यास सुरुवात केली आहे. १९९० पर्यंत असेच काहीसे हरितक्रांतीच्या पहिल्या टप्यातील पंजाब, हरियाणा, पश्चिम उत्तर प्रदेश सारख्या प्रदेशांमध्ये शेतकरी आत्महत्येची नोंद होत होती. मात्र १९९० नंतर देशाच्या इतर भागातही आत्महत्येचे सत्र सुरु झाले. २०१४ पर्यंत देशभरात तब्बल ३ लाख २० हजार पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी जीवन संपवल्याचे आकडेवारी सांगते. जम्मू.कश्मीर आणि नॉर्थ इस्ट सोडता शेतकरी आत्महत्या झाल्या नाही असा कुठलाच भाग नाही. आधि केवळ अल्पभूधारक शेतकरी आत्महत्या करीत असल्याची परिस्थिती होती. मात्र आता सर्वच प्रकारचे लहान, मध्यम, मोठे शेतकरी आणि शेतमजूर देखील आत्महत्या करीत असल्याचे आकडेवारी सांगते.

## अभ्यास पध्दती :—

प्रस्तूत शोधनिबंध लिहिताना महाराष्ट्र शासनाचे विविध अहवाल, साप्ताहिके, पुस्तके वर्तमानपत्रे इत्यादीमधून दुय्यम सामग्रीचे संकलन केले आहे. इंटरनेटव्दारे काही सामग्री संकलित केली आहे.

## अभ्यासाची उद्दीष्टे :

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येची समस्या अभ्यासणे.

शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या प्रश्नांची तिव्रता अभ्यासणे.
शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या कारणांचा अभ्यास करणे.
शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी संभाव्य उपायांची चर्चा करणे.

## शेतकरी आत्महत्येचे स्वरूप :–

राष्ट्रीय अपराध लेखा कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार भारतात १९९५ ते २०११ काळात देशात ७,५०,८६० शेतकऱ्यांनी आत्महत्या केली त्यापैकी महाराष्ट्रात ५०,८६० शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. २०११ मध्ये मराठवाडयातील ४३५ विदर्भातील २२६ आणि खांन्देशातील १३३ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. देशातील आंध्रप्रदेश, कर्नाटक, महाराष्ट्र, तामिळनाडू या राज्यात आत्महत्या करणाऱ्यांचे प्रमाण जास्त आहे.

२०१३ नंतर देशभरात दरवर्षी १२ हजारापेक्षा जास्त शेतकरी आत्महत्या करत असल्याचे केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात सांगितले.

| **राज्य** | महाराष्ट्र | कर्नाटक | तेलंगणा | मध्यप्रदेश | छत्तीसगढ | आंध्रप्रदेश | तामिळनाडु |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **आत्महत्या** | ४२९१ | १५६९ | १४०० | १२९० | ९५४ | ९१६ | ६०६ |

***संदर्भ : दै. सामना ४ मे २०१७***

राज्यात सर्वाधिक आत्महत्या हया महाराष्ट्र या राज्यात दिसून येतात तर तामिळनाडू मध्ये ६०६ ही आकडेवारी दिसून येते.

महाराष्ट्रात सर्वाधिक म्हणजे ४२९१ शेतकऱ्यांनी या कालावधीत आपले जीवन संपविले होते. महाराष्ट्रासह मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, तामिळनाडू, छत्तीसगढ, तेलंगना आणि कर्नाटक या सात राज्यांमध्ये देशातील एकूण शेतकरी आत्महत्याच्या ८७.५ टक्के शेतकऱ्यांनी जीवन संपविले आहे.

केंद्र सरकारने न्यायालयात सादर केलेल्या आकडेवारीत असे नमूद केले आहे की, सन २०१५ मध्ये देशात एकूण १,३३,६२३ जणांनी जीवन संपविले त्यापैकी १२ हजार ६०२ कृषी क्षेत्राशी निगडीत असून ८००७ शेतकरी आणि ४५९५ शेतमजूर होते. एकूण आत्महत्येच्या तुलनेत शेतकरी आत्महत्यांची टक्केवारी ९.४ टक्के होती.

## भारतातील शेतकरी आत्महत्या

| **वर्षे** | **राज्य** | | |
|---|---|---|---|
| | **महाराष्ट्र** | **मध्यप्रदेश** | **कर्नाटक** |
| २०१४ | १९८१ | ८२६ | १२२ |
| २०१५ | ३२२८ | १२९० | १४७८ |
| २०१६ | ३०५२ | १९८२ | ८४८ |
| **एकूण** | **८६५१** | **४०९८** | **२४४८** |

***संदर्भ :– दै. सकाळ ६ मे २०१७***

वरील आकडेवारीवरून २०१४ ते २०१६ या ती वर्षाच्या काळात इतर राज्याच्या तुलनेत महाराष्ट्र राज्यात सर्वाधिक शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या.

शेतकऱ्यांचे जीवनमान सुधारण्यासाठी राज्य सरकारच्यावतीने जलयुक्त शिवार, शेततळी, शेतकरी पॅकेज घोषीत केले असले तरी गेल्या तीन वर्षात महाराष्ट्रात सर्वाधिक आत्महत्या झाल्या असल्याची माहिती समोर आली आहे. इतर राज्याच्या तुलनेत ही आकडेवारी चिंता निर्माण करणारी आहे. आत्महत्याग्रस्त राज्यात मध्येप्रदेशचा दुसरा क्रमांक आहे. गेल्या तीन वर्षात राज्यात ८ हजार ६५१ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची नोंद आहे.

महाराष्ट्रात शेजारी प्रांत असलेल्या मध्यप्रदेश, कर्नाटक आणि गुजरातपेक्षा महाराष्ट्रात गेल्या तीन वर्षात सर्वाधिक आत्महत्या झाल्या आहेत. शेतकरी आत्महत्येत महाराष्ट्रात सर्वात वरचा क्रमांक दिसून येते.

**महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्या**

| अ.क्र. | वर्ष | शेतकरी आत्महत्या | | शेतकरी आत्महत्या (एकूण) |
|---|---|---|---|---|
| | | पुरूष | स्त्री | |
| १ | २००५ | ३६३८ | २८८ | ३९२६ |
| २ | २००६ | ४१११ | ३४२ | ४४५३ |
| ३ | २००७ | ३९६८ | २७० | ४२३८ |
| ४ | २००८ | ३५७३ | २२९ | ३८०२ |
| ५ | २००९ | २६९२ | १८० | २८७२ |
| ६ | २०१० | २९४७ | १९४ | ३१४१ |
| ७ | २०११ | ३०९३ | २४४ | ३३३७ |
| ८ | २०१२ | ३४८३ | ३०३ | ३७८६ |
| ९ | २०१३ | ३०२० | १२६ | ३१४६ |
| १० | २०१४ | ३७२६ | २७८ | ४००४ |

**source : ncrb.nic.in**

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, २००५ मध्ये ३९२६ शेतकऱ्यांची आत्महत्या केल्या आहेत. २०१५ मध्ये ३१४१ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. तर २०१३ मध्ये ३१४६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. हे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. २०१४ मध्ये ४००४ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे दिसून येते.

**महाराष्ट्रातील विभागनिहाय शेतकरी आत्महत्या**

| विभाग | अमरावती | औरंगाबाद | नाशिक | नागपूर | पुणे | कोकण |
|---|---|---|---|---|---|---|
| **आत्महत्या** | १०८५ | १०५३ | ४७९ | ३६० | ७५ | ० |

***संदर्भ :– ABP माझा, जाने–डिसें २०१६***

जानेवारी ते डिसेंबर २०१६ या कालावधीत महाराष्ट्रात ३ हजार ५२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची माहिती आहे. मराठवाडयात २०१५ पाठोपाठ २०१६ मध्ये ही शेतकरी आत्महत्यांनी एक हजाराचा आकडा पार केला आहे. २०१६ मध्ये मराठवाडयातील आठ जिल्हयांपैकी सर्वाधिक आत्महत्या बीड जिल्हयात झाल्या आहेत.

## शेतकऱ्यांच्या आत्महत्येची कारणे :–

### १) वाढता कर्जबाजारीपणा :–

वाढता कर्जबाजारीपणा हे आत्महत्येचे प्रमुख कारण आहे. शेती क्षेत्राला सवलतीच्या दराने होणारा वित्तपुरवठा अद्यापही अपुरा आहे. स्वातंत्र्योत्तर काळात राष्ट्रीयकृत बॅंका व वित्तीय संस्थांनी शेतकऱ्यांना सुलभ कर्ज पुरवठा करण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु अजुनही दूरवर पसरलेल्या सर्व खेडयांतील शेतकऱ्यांपर्यंत हा कर्ज पुरवठा पोहोचलेला नाही. यामुळे शेतकऱ्यांना खाजगी सावकारांकडून कर्जे घेण्याचा मार्ग पत्करावा लागतो. अवाजवी व्याज दरामुळे अशी कर्जे घेणे शेतकऱ्यांना परवडत नाही तो कर्जाच्या सापळयात अडकून पडतो. सहकारी पतपुरवठा संस्था व इतर बॅंकाकडून कर्जे मिळाली तरी शेतकऱ्याने ती कर्जाची रक्कम गुंतविल्यानंतरही उत्पान्नाची हमी नसते. अनियमित पाउस,हवामानातील बदल, कीड व किटकांचा प्रादूर्भाव इत्यादी कारणामुळे पिके हाती येतीलच असे नाही. अशा स्थितीत कर्जाचे हप्ते वेळेवर भरता येत नाहीत. मुद्दल व व्याज यांच्या रक्कमा थकीत होतात. हप्ते वेळेवर न भरल्याने बऱ्याचदा शेतकऱ्यांना व्याजावर व्याज द्यावे लागते. यातून त्यांचा कर्जबाजारीपणा वाढतो. अशा सततच्या कर्जबाजारीपणाला कंटाळून शेतकरी आत्महत्या करतात.

**२) व्यवसाय शिक्षणाचा अभाव :—**

भारतातील व महाराष्ट्रातील शेतकरी हा परंपरागत पध्दतीने शेती करतो. बहुतांश शेतकरी हे कमी शिक्षण घेतलेले आहेत. जे थोडे शिकलेले आहेत ते ही शेतीचे अर्थशास्त्र व्यवस्थापन यापासून दूरच राहिलेले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना कमी खर्चात जास्त उत्पन्न होण्याच्या पध्दती शिक्षण मिळालेले नसते. परिणामी शेतकरी तोटयात जातो.

**३) शासनाचे धोरण :—**

शासनाची धोरणे ही शेतकऱ्यांना प्रत्यक्ष मदत करणारी नसतात. शासनाची धोरणे ही फक्त कागदावरच असतात ते प्रत्यक्ष समस्या सोडवण्यात लक्ष घालतात असे नाही. धोरणे राबवली तरी ती वेळ गेल्यानंतर शेतकऱ्यांपर्यंत पोहोचतात. उदा. अर्थपुरवठा, वीज रोगांचा प्रादूर्भाव पडल्यास पीक गेल्यानंतर उपाययोजना येतात.

**४) शेतमालाच्या किंमतीत चढ उतार :—**

शेतमालाला मिळणारा अल्प भाव यामुळेही शेतकरी वर्ग अडचणीत सापडतो. गोदामाच्या पुरेशा सोयी उपलब्ध नसल्याने शेतकऱ्याला माल विक्री करण्याची घाई करावी लागते. अर्थात मिळेल त्या दराने शेतमालाची विक्री केली जात असल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होते. बाजारात शेतमालाचा भाव कधी वधारतो तर कधी घसरतो. शेतमालाचा भाव जेव्हा वाढतो तेव्हा त्याचा फायदा प्रामुख्याने बाजारातील व्यापाऱ्यांना व दलालांना होतो. शेतकरी वर्ग अशा लाभांपासून वंचित राहतो. शेतमालाचे भाव जेव्हा घसरतात तेव्हा त्याचा फटका मात्र शेतकऱ्यांना बसतो. शेतमालाच्या किंमतीच्या चढउतारामुळे शेवटी शेतकऱ्यांचे नुकसान होत असते.

**५) अनियमित पाउस :—**

शेतीसाठी कायमस्वरूपाच्या पाण्याची गरज असते. पण भारतातील सद्यपरिस्थिती कायम स्वरूपी पाणी उपलब्ध नाही. परिणामी पाण्याअभावी शेती उत्पादन वाढत नाही. अपुऱ्या सिंचन सुविधा हे ही शेतकऱ्यांना आत्महत्येस जबाबदार आहे. महाराष्ट्रातील सरासरी सिंचन ११ टक्के इतके आहे.

**६) वीजेची समस्या :—**

शेतीसाठी उपलब्ध असलेले पाणीही शेतकरी विजेअभावी विकास देऊ शकत नाही ही समस्या सर्वांत जास्त महत्वाची वाटते. उदा. ताटात वाढलेले आहे पण खाता येत नाही अशी स्थिती शेतकऱ्यांची बनलेली आहे.

**७) रूढी, परंपरा व सामाजिक प्रथांचा प्रभाव :—**

शेतकरी वर्गावर रूढी, परंपरा व प्रथांचा प्रभाव आहे. रूढी व परंपरेचे पालन करण्यासाठी तो अडचणीत असूनही पैसे खर्च करतो.धार्मिक विधी, घरगुती समारंभ वा इतर प्रथांचे पालन करण्यासाठी प्रसंगी तो कर्ज ही काढतो. काही वेळा शेतीसाठी काढलेली कर्जे अशा अनुत्पादक बाबींवर तो खर्च करतो. यामुळे कर्जाच्या परतफेडीच्या वेळी अडचणी निर्माण होतात. शेतकऱ्यांवरील कर्जाचा डोंगर वाढत जाउन त्यांच्यात आत्महत्येची मानसिकता निर्माण होते.

**8) उच्च उत्पादन खर्च :—**

अनेकदा शेतक—यांनी शेतीसाठी घेतलेला कर्ज बिगर कृषी कारणसाठी वापरली जातातत्र सण, समारंभ, उत्सव, विवाह, ि"क्षण, आजारण इत्यादी बाबींवर कर्जाची रक्कम खर्च केली जाते. यामुळे अ"ाा खर्चातून कर्जाच्या परतफेडीची क्षमता तर निर्माण होत नाहीच ि"ावाय कृषी उत्पादकतेवर ही त्याचा विपरीत परिणाम होतो. कर्जाचे उत्पादक व अनुत्पादक असे प्रकार पडतात. उत्पादक खर्च हा चांगला समजला जातो तर अनुत्पादक खर्चातून काहीही निष्पण होत नाही. शेतकरी कर्जे का काढतो व मोठया प्रमाणावर अनुत्पादक बाबींवर खर्च करतो. अ"ाी कर्जे न फिटल्याने शेतक—यांचा कर्जबाजारीपणा वाढतो. एवढेच नव्हे तर उच्च उत्पादन खर्च हा घटकही शेतक—यांच्या आत्महत्येस जबाबदार आहे. तसेच अलीकडिल काळात शेतीसाठी लागणारी रायासनिक खते, बी—बीयाणे, किटकना"ाके इत्यादींच्या किंमती वाढल्या आहेत. प्रा. हनुमंतराव पाटील यांनी केलेल्या सर्वेक्षणानूसार परभणी जिल्हयात 1 रुपया मूल्याच्या कापूस उत्पादनासाठी 1 रुपया 16 पैसे इतका खर्च येतो. याचाच अर्थ असा की, शेतक—यांना 1 रुपया मूल्याच्या कापूस निर्मितीसाठी 16 पैसे इतके नुकसान सहन करावे लागते. एकंदरीत वाढता उत्पादन खर्च हे शेतक—यांच्या आत्महत्येचे कारण ठरते.

## 9) शेतीचे तुकडीकरण

लोकसंख्या वाढीमुळे जमीनीचे अनेक लहान लहान भागात विभागणी झालेली आहे. परिणामी ते या लहान लहान शेती करण्यास व शेतीसाठी आधुनिक तंत्रज्ञान वापरण्यास फारसे फायदे"ीर ठरत नाही. परिणामी उत्पन्न स्थिर राहते.

## 10) कृषी धोरणाचा अभाव :

भारतात योग्य अ"ाा कृषी क्षेत्रात सर्व समावे"ाक धोरणाचा आभाव आहे. पीक नियोजन करणे, कृषी आदाने, योग्य तंत्रज्ञान, भांडवलाचा पुरवठा, बाजारपेठ, शेतमालाच्या वस्तूंची निर्यात इत्यादीची व्यवस्था मजबूत करणारे सर्व समावे"ाक कृषी धोरण आखून त्याची प्रभावीपणे कार्यवाही करणे नितांत गरजेचे आहे. यां"िावाय भाववाढीमुळे शेतक—यांची आर्थिक स्थिती वाईट बनते. कौटूंबिक कलह व संघर्ष, मुला—मुलींच्या लग्नाचा वाढता खर्च, आरोग्य विषयक समस्या व व्यसनाधीनता इत्यादी कारणे ही शेतक—यांच्या आत्महत्येस जबाबदार आहेत.

## शेतकऱ्यांच्या आत्महत्येवरील उपाय :—

शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या रोखण्यासाठी निरनिराळे उपाय प्रभावीपणे योजण्याची गरज आहे.

### १) विपणन व्यवस्था :—

शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्यासाठी सर्वप्रथम विपणन व्यवस्था भक्कम केली पाहिजे. विपणन व्यवस्थेतील शेतकऱ्यांचे स्थान मजबूत केले पाहिजे. शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य भाव मिळाला पाहिजे. बाजारात शेतमालाचे भाव बऱ्यापैकी असतात. परंतु त्या किंमतीतील शेतकऱ्यांचा हिस्सा खूपच कमी असतो बाजारातील दलाल, व्यापारी व अडते या मध्यस्थांचा बाजारात सहभाग असल्याने शेतकऱ्यांच्या मालाला अल्पभाव मिळतो. यासाठी शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळतील अशी व्यवस्था केली पाहिजे.

### २) सिंचनाच्या सोयीत वाढ करणे :—

सिंचनसोई अपुऱ्या असल्याने शेतीची उत्पादकता कमी राहते. शेतकऱ्यांचे उत्पन्न मर्यादित राहून आर्थिक समस्यांना त्याला तोंड द्यावे लागले. भारतातील ४० टक्के क्षेत्र सिंचनाखाली आहे तर महाराष्ट्रभर हे प्रमाण जवळपास १६ टक्के इतके आहे म्हणजेच राज्यातील बारमाही पाणी पुरवठयाखालील जमीन वाढविण्यासाठी गरज आहे. जमिनीतील पाण्याचे पुनर्भरण करण्यावर भर दिला पाहिजे. सामान्यपणे तुषार सिंचनामुळे ३० ते ३५ टक्के पाणी वापराची बचत होते. शेतकऱ्यांना जल व्यवस्थापनाचे प्रशिक्षण दिले पाहिजे. तसेच स्वस्त अखंड व पुरेसा वीज पुरवठा उपलब्ध होण्याची गरज आहे.

### ३) अल्पदराने कर्जपुरवठा :—

शेतकऱ्यांमधील कर्जबाजारीपणा कमी करण्यासाठी त्यांना अल्प वा सवलतीच्या दराने कर्जपुरवठा होणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांची सावकारी पाशातून मुक्तता करण्यासाठी व निसर्गाने दगा दिल्याने झालेले नुकसान भरून काढण्यासाठी कमी दराने कर्जपुरवठा होण्याची आवश्यकता आहे. तसेच शेतकऱ्यांना बिगर कृषी कारणांसाठीही कर्जपुरवठा झाला पाहिजे. जेणेकरून ते बिगर कृषी वा उपभोग्य कर्जासाठी सावकाराचा मार्ग धरणार नाहीत आणि त्यांचा कर्जबाजारीपणा कमी होउन आत्महत्येचे प्रमाण कमी राहिल.

### ४) आकस्मिक निधी :—

अतिवृष्टी, महापूर, हवामानातील बदल इत्यादी नैसर्गिक घटकांवर शेतकऱ्यांचे होणारे नुकसान भरून काढण्यासाठी आकस्मीक निधी उभारला पाहिजे. बॅका वित्तीय संस्था, राज्य सरकार व केंद्र सरकारने यात योगदान द्यावे या निधीमुळे शेतकऱ्याचा कर्जबाजारीपणा कमी होईल.

### ५) ई—चौपालचा विस्तार :—

शेतीची उत्पादकता वाढवून शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखता येतील. त्यासाठी शेतीत नव्या तंत्रज्ञानाचा वापर वाढावा म्हणून ई—चौपाल पध्दतीचा विस्तार केला पाहिजे. ई—चौपाल या प्रतिमानुसार ई—चौपालमध्ये म्हणजे दालनांमध्ये शेतकऱ्यांना सर्व उपयुक्त


LBP PUBLICATION

माहिती देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. यासाठी वेबसाईट निर्माण केल्या आहेत. कृषी मालाची मागणी, विविध प्रकारच्या कृषी मालाचे उत्पादन, स्थानिक हवामानाची स्थिती, हवामानाबाबतचा अंदाज, नवीन कृषी तंत्रज्ञान, कृषी मालाचे चालू बाजारभाव इत्यादी स्वरूपाची माहिती वेबसाईटव्दारे उपलब्ध करून दिली जाते. आतापर्यंत ITC या संस्थेने ५५०० ई–चौपालांची स्थापना केली आहे.

### ६) कंत्राटी शेतीला उत्तेजन :–

शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या रोखण्यासाठी कंत्राटी शेतीला उत्तेजन दिले पाहिजे. शेतमालाचा उत्पादक आणि खरेदीदार यांच्यामध्ये कराराप्रमाणे उत्पादन व पुरवठा करण्याची व्यवस्था म्हणजे कंत्राटी शेती होय. कंत्राटी शेतीमुळे शेतकऱ्यांना उत्पादन तंत्र, खते, बियाणे आदींचा पुरवठा व इतर मार्गदर्शन प्राप्त होते. तसेच खरेदीदाराला दर्जेदार उत्पादन मिळविता येते. पंजाबमध्ये कंत्राटी शेतीमुळे शेतीची प्रति हेक्टरी उत्पादन क्षमता २५ ते ४० टक्यांनी वाढल्याचे आढळून आले आहे.

### ७) व्यवसाय शिक्षणाची व्यवस्था करावी. :–

ग्रामीण भागातील शेतकऱ्यंना शेतीचे व्यवस्थापन, नियोजन व बाजारपेठ माल टिकण्याच्या पध्दतीचे ज्ञान देणे गरजेचे आहे. त्यासाठी प्रत्येक गावोगावी प्रशिक्षण वर्ग बोलावेत. त्याचप्रमाणे प्राथमिक स्तरापासूनच कृषी हया विषयाचा अभ्यासक्रमात समावेश करावा.

### ८) डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांचे उपाय :–

राष्ट्रीय शेतकरी आयोगाचे अध्यक्ष डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांनी शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी काही उपाय सुचविले आहेत. कापसावरील आयात शुल्कात वाढ करावी, कापासावर आगाउ बोनस देण्यात यावा. किंमत स्थिरीकरण निधी स्थापन करण्यात यावा. जमिनीतील पाण्याचे पुनर्भरण सक्तीचे करावे. कृषी कर्जावरील व्याजदर ४ टक्यांपर्यंत कमी करावे, विपणनासाठी आधारभूत संरचनेकरिता पत पुरवठा करण्यावर भर द्यावा, स्वयं सहाय्यता गटांची प्रगती साधणे, किसान कॉल सेंटरची गरज पटवून देणे यासारखे उपाय डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांनी सुचविले आहेत.

### 9) समुपदेशन केंद्राची आवश्यकता

शेतक–यांच्या आत्महत्या मानसिक दुर्बलतेतूनही होत असल्याचे मत अनेक विचारवंतांनी मांडले आहे. भारतात 40 टक्के तर महाराष्ट्रात 16 टक्के क्षेत्र सिंचनाखाली आहे. अलिकडिल काळात शेतीकरणे परवडत नाही व शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी प्रत्येक गावात एक समुपदे"ान केंद्र चालवण्याची आव"यकता आहे. शेतक–यांचा कर्जबाजारीपणा, दारीद्रय व निसर्गाचा फटक इत्यादी कारणांनी शेतकरी अडचणीत सापडलेला आहे शेतक–याला या समस्येतून बाहेर काढण्यासाठी सल्ला, मार्गद"ान व मानसीक आधाराची गरज आहे.

### 10) शून्य आत्महत्या अभियान

अवकाळी पाउस शेतीला होणारा मर्यादित अर्थपुरवठा, बाजारात कृषी विषयक उत्पादनांवर मिळणारा कमीभाव या सर्व बाबींचा विचार करीत शेतक–यांचे प्र"न सोडविण्यासाठी भूमिका "ाासनाने मांडली. शेतक–यांच्या आत्महत्या हा महाराष्ट्रासाठी कलंक आहे तेव्हा समस्याग्रस्त शेतक–यांना दिलासा देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने 14 एप्रिल 2015 रोजी शून्य आत्महत्या अभियानाची घोषणा केली.

**11)** स्वातंत्रोत्तर काळात सरकारने सावकारी पध्दतीवर नियंत्रण आणले आहे. अलीकडील काळात विना परवाना सावकारांचे वर्चस्व ग्रामीण भागात वाढत आहे. त्यांच्याकडून शतक–यांचे प्रचंड शोषण होत आहे. विना परवाना सावकाराचा शोध घेउन सरकारने त्यांच्यावर कडक कार्यवाही करावी.

**12)** आदानाच्या वाढत्या किंमती आणि कृषी उत्पादनाच्या घटत्या व स्थिर किंमती यामुळे शेतक–यांचे उत्पन्न कमी होते. यासाठी सरकारने आधार किंमतीत वाढ करावो.

**13)** निकृष्ट आहार व आजारपणामुळे शेतक–यांची कार्यक्षमता कमी होते. ब–याच शेतक–यांचा निकृष्ट आहार व त्यातून आजारपणावरील खर्च वाढत जातो. उत्पादनाचा मोठा हिस्सा आजारपण खर्च होतो. त्यामुळे शेती उत्पादनासाठी भांडवल, रासायनिक खते व बियाणे यावर खर्च होत नाही.

**14)** सर्वात महत्वाची उपाय योजना म्हणजे एखादा शेतकरी कर्जबाजारी झाला असेल तर समाजाने त्यांना सामाजिक, मानसिक व आर्थिक मदत दयावी. जेणे करुन तो आत्महत्येचा अविचार करणार नाही. याकरिता समाजाने योग्य ते प्रयत्न केले पाहिजे.

## समारोप :–

शेतकऱ्यांच्या आत्महत्येला त्यांचा कर्जबाजारीपणा प्रामुख्याने जबाबदार आहे. शेतकऱ्यांचे दारिद्रय, पर्यायी रोजगाराचा अभाव, शेतीचे पावसावरील अवलंबित्व, सावकारी कर्जाचा अवाजवी व्याजदर, बॅकांकडून कर्ज वसूलीसाठी आपणला जाणारा दबाव ही सर्व कारणे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणाशी निगडित आहेत. म्हणून शेतकऱ्यांचा कर्ज बाजारीपणा कमी करण्यासाठी प्रयत्न करण्याची नितांत आवश्यकता आहे. त्यासाठी सरसकट कर्जमाफी न देता शून्य व्याजदराने पुरेसे कर्ज वितरित करावे. नियमित कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान द्यावे. शेतकऱ्यांच्या शेतमालाला हमीभाव वाटून द्यावा. यातून कर्जबाजारीपणा कमी होईल व आत्महत्येचे प्रमाणकमी होईल.

## संदर्भ ग्रंथसूची :–

१) Report on farmers suicides in Maharashtra 2006
२) Economic and political weekly, Dec, 8-14, 2007
३) डॉ. देसाई, डॉ. सौ. भालेराव, भारतीय अर्थव्यवस्था
४) डॉ. चव्हाण एन. एल., 'भारतीय अर्थव्यवस्था–१', प्रशांत पब्लीकेशन, जळगाव (२०१५) पृ.क्र. २५२–२५५
५) योजना अंक – ऑगस्ट २००७
६) मासिक, स्कॉलर ॲकॅडमी, पुणे
७) अर्थसंवाद–त्रैमासिक, ऑक्टों–डिसें–२००९ खंड ३३ अंक३, पृ.क्र २१७ ते २२२
८) अर्थसंवाद–त्रैमासिक, जुलैं–सप्टें–२०१२ खंड ३६ अंक २, पृ.क्र १७२ ते १७६
९) अर्थसंवाद–त्रैमासिक, जुलै–सप्टें–२०१५ खंड ३९ अंक २, पृ.क्र १७६ ते १८३
१०) अर्थसंवाद–त्रैमासिक, जुलैं–सप्टें–२०१६ खंड ४० अंक २, पृ.क्र १९१ ते २०३
११) www.farmers of causes of suicides
१२) www.effect of farmer's suicides
१३) www.ncrb.nic.in
१३) दैनिक सकाळ, ३ मे २०१७
१४) दैनिक सामना, ४ मे २०१७
१५) ABP माझा

LBP PUBLICATION